दा. क्र. ३६८८

# महाराष्ट्रवंदन

ता. १२।८।२८
ठाणे.

## ( प्रवेशिका )

परमार्थांत परमेश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग आहेत. त्यांत सर्वांत सुलभ भक्तिमार्ग आहे. त्या भक्तिमार्गांतदेखील परमेश्वराच्या मंगल नामाचें स्मरण ही गोष्ट आबालवृद्धांत फार आवडणारी सोपी व इष्टफल देणारी आहे. नामस्मरण आपणांमध्यें फार प्राचीन कालापासून रूढ झालें आहे. या प्रवृत्तीमुळें व पद्यरचना पठनाला व स्मरणाला साहाय्य करणारी असल्यामुळें विष्णुसहस्र-नामासारखीं संस्कृत पद्यमय स्तोत्रें व नामपाठाचें मराठा पद्य-वाङ्मयही निर्माण झालें आहे. देवाचें नुसतें नांव किंवा त्याचीं नांवें घेण्यांत काय अर्थ आहे अशी शंका कोणी घेत नाहीं. याचें कारण असें आहे कीं, देव परम मंगल आहे, ही कल्पना गृहीत असल्यानें त्याचें नामही मंगलच असावयाचें अशी दृढ भावना असते. अशिक्षित व अज्ञ जन यांना, प्राय: अशा भावनेनेंच, नामस्मरण प्रिय झालेलें असतें. यांच्या वरचा वर्ग साक्षर व सुसंस्कृत लोकांचा. त्याला नामाचें माहात्म्य समजण्याची पात्रता असते. परमेश्वराच्या कोणत्याही नांवांत त्याचें महत्त्व दर्शवि-णारा असा एखादा तरी उज्ज्वल गुण असतो, हें त्यास समजतें. परमेश्वराचे गुण अनंत असल्यामुळें त्याचीं त्या त्या गुणांचीं सूचक अशीं अनंत नांवें प्रचारांत आलीं. या नामांचें पठन म्हणजे परमेश्वराच्या तितक्या गुणांचें स्मरण किंवा संकीर्तन होय. अशा

नामस्मरणानें किंवा नामसंकीर्तनानें परमेश्वराचें दिव्य व सकलैश्वर्यसंपन्न स्वरूप मनापुढें उभें राहतें; व त्यायोगानें मनुष्यास आपली क्षुद्रता व मलिनता पटून तो भक्तिप्रवण व विनम्रभावानें देवास अनन्यगतिक होऊन शरण जातो व त्याच्या कृपेनें मुक्त होतो. नामस्मरणाचें असें महत्त्व मनांत आणूनच व्यासादिकांनीं विष्णुसहस्रनामासारखीं स्तोत्रें रचिलीं व श्रीमच्छंकराचार्यांसारख्या महापंडितांनीं त्यांस भाष्याचा मान दिला. कोणत्याही मंगलकार्याच्या आरंभीं नांदीश्राद्ध करण्याचा, श्रावणीच्या विधींत प्राचीन पूज्य आचार्यादिकांना आवाहन करून आसन व पूजा यांचा मान देण्याचा, व नित्य तर्पणांतही देव, ऋषि व पितर यांना श्रद्धेनें स्मरणपूर्वक सलिलांजलि अर्पण करण्याचा आपला फार जुना परिपाठ आहे. यांतसुद्धां पूर्वजांच्या पवित्र नामस्मरणाचें बीज आहे.

जशी परमार्थाची तशीच राजकारणाची गोष्ट आहे. परमार्थांतील अधिष्ठात्री देवता जशी परमेश्वर तशी राजकारणांतील अधिष्ठात्री देवता स्वतंत्रता होय. प्रचलित हिंदी राजकारणांत कितीही पक्ष व उपपक्ष असले व ध्येय प्राप्त करून घेण्याचीं त्यांचीं साधनें कितीही विविध व विचित्र असलीं, तरी ध्येयासंबंधानें सर्वांचें ऐकमत्य आहे, ही गोष्ट स्पष्ट व निर्विवाद आहे. ध्येयप्राप्तीच्या मार्गांत सर्वांच्या मनश्चक्षूपुढें 'राष्ट्रदेवो भव' हा एकच पवित्र व उदात्त महामन्त्र आहे. राजकारणांत स्वतंत्रता देवीचीच प्रतिष्ठा व अग्रपूजा असते.

कोणत्याही कालांत व देशांत बालविद्यार्थी पुढील पिढीचे आधारस्तंभ असतात. ' राष्ट्रदेवो भव ' या मंत्रांतील स्फूर्तिदायक भावनेचें बीजारोपण करण्यास बालविद्यार्थ्यांच्या कोमल मनासारखें दुसरें योग्य व पवित्र क्षेत्र नाहीं. पाश्चात्य व पौरस्त्य स्वतंत्र राष्ट्रांत लहान विद्यार्थ्यांस स्वराज्य, स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा इत्यादिकांविषयीं प्रेम व आदर उत्पन्न होईल अशी त्यांच्या शिक्षणक्रमांत व्यवस्था केलेली असते. यामुळें त्या विद्यार्थ्यांस लहानपणींच वरील गोष्टींविषयीं योग्य अभिमान वाटूं लागतो व पुढें ते राष्ट्रभक्त होऊन देशकार्य करावयाला समर्थ होतात.

विद्यार्थ्यानें प्रथम देशभक्त झालें पाहिजे. ही प्रमुख कल्पना डोळ्यापुढें ठेवून त्याच्या शिक्षणक्रमाची व्यवस्था होणें अवश्य आहे. विद्यार्थ्यामध्यें देशभक्तीचें बीजारोपण जितकें लवकर करितां येईल तितकें केलें पाहिजे. विद्यार्थ्याला कळूं लागून त्याला वाचनाची गोडी लागल्याबरोबर त्यास देशभक्तीचें बाळकडू देण्यास आरंभ केला पाहिजे. धार्मिक गोष्टींत ज्याप्रमाणें प्रातःस्मरणें, स्तोत्रें, भूपाळ्या, नामपाठ, मनाचे श्लोक इत्यादिकांची योजना पूर्वजांनीं दूरदृष्टीनें करून ठेविल्यामुळें तिचा, मुलांमध्यें धार्मिक प्रवृत्ति उत्पन्न करण्याच्या कामीं, उपयोग होत आला आहे; त्याप्रमाणें राष्ट्रिय बाबतींत देशभक्ति उत्पन्न करणारीं कवनें तयार झालीं पाहिजेत व तीं लहान मुलांच्या जिव्हेवर सहजासहजीं खेळलीं पाहिजेत. असें झालें असतां मुलांच्या ठिकाणीं स्वदेशप्रेम बाणून स्वदेशाविषयीं त्यांच्या मनांत योग्य अभिमान उत्पन्न होईल.

अशा दृष्टीनें महाराष्ट्रिय विद्यार्थ्यांकरितां प्रस्तुतचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राला इतिहास आहे. त्यानें स्वातंत्र्य व स्वराज्य उपभोगिलें आहे. त्यांत सर्व प्रकारचीं उज्ज्वल ध्येयें आहेत. त्यानें कांहीं गोष्टींत आपली परंपराही कायम ठेविली आहे. संत, कवि, राजे, वीर, मुत्सद्दी, पंडित, ग्रंथकार, कला-संपन्न पुरुष इत्यादि सर्व प्रकारचे लोक राष्ट्राचे घटक होत. महाराष्ट्राला हे घटक लाभलेले आहेत. या सर्वांचें एके ठिकाणीं नामस्मरण करून यांस वंदन करणारा पद्यात्मक लघु प्रयत्न झालेला, आमच्या तरी, अवलोकनांत नाहीं. म्हणून तसा हा यत्न केला आहे. यांत महाराष्ट्रराज्यसंस्थापक श्रीशिवाजीमहाराज व महा-राष्ट्रसंतकविसम्राट् श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्यापासून तों अगदीं आलीकडील लोकनायक लो० बाळ गंगाधर टिळक यांच्या पर्यंतच्या ठळक वंदनीय दिवंगत महाराष्ट्रिय विभूतींना श्रद्धापूर्वक वंदन केलें आहे; आणि म्हणूनच याला ‘महाराष्ट्रवंदन’ असें नांव दिलें आहे.

महाराष्ट्रिय दिवंगत विभूतींस वंदन करण्याची ही कल्पना मनांत आल्याबरोबर फार थोड्या वेळांत प्रस्तुत स्वरूपांत परिणत झाली. आरंभीं स्थल, काल, विषय इत्यादिकांचे योग्य विभाग दृष्टीपुढें मुळींच नव्हते. विभूति जशा डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या तशीं पद्यें रचीत गेलों. कुठें व्यक्तीचें नुसतें नामस्मरणच झालें. कुठें त्याबरोबर थोडेसें वर्णनही झालें. वर्णनांतही संकोच व विस्तर यांच्या प्रमाणाचें भान राहिलें नाहीं! महाराष्ट्रिय विभूतींनाच वंदन

काव्य ७१४

करण्याचा संकल्प असतांही अनवधानानें कबीर, तुळशीदास, शेख महंमद यांच्यासारख्यांचेंही संकीर्तन होऊन गेलें ! सर्वच भिस्त स्मरणावर ठेविल्यानें यांत कांहीं विभूति राहिल्याही असतील. असो. हा प्रयत्न वाचकांना आवडला व याच्या पुनर्मुद्रणाचा योग आला तर योग्य फेरफार करून अधिक व्यवस्थित रीतीनें हा प्रकाशित करण्याचा विचार आहे.

आज विजयादशमीच्या सुमुहूर्तावर ‘ महाराष्ट्रवंदन ’ प्रकाशित करीत आहों. याचे स्थूलमानानें पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग कल्पिले आहेत. पहिल्यांत श्रीशिवाजीमहाराज, त्यांचे वंशज, पेशवे, वीर, सरदार, मुत्सद्दी इत्यादिकांचें वंदन केलें आहे; दुसऱ्यांत श्रीज्ञानेश्वरांपासून तों लो० टिळकांपर्यंतचे कवि, मुत्सद्दी, ग्रंथकार इत्यादिकांचें संकीर्तन केलें आहे.

यांत लिंग, जाति, वर्ण, वय, पक्ष इत्यादिकांना अवसर दिला नाहीं. केवळ गुणांवर दृष्टि ठेविली आहे. यांत कोठें नुसतें नांव तर कोठें नुसतें उपनांव आलें आहे. त्यांवर पृष्ठाखालीं टीपा दिल्या आहेत. त्यांवरून त्या त्या विभूति कोण आहेत याचा बोध वाचकांस होईल. या वंदनाचें वृत्त प्रायः भुजंगप्रयात ’ आहे. समर्थांचे ‘ मनाचे श्लोक ’ याच वृत्तांत आहेत. हें वृत्त विद्यार्थ्यांच्या ओळखीचें आहे. कोठें कोठें दुसरींही प्रसिद्ध वृत्तें योजिलीं आहेत. केवळ धार्मिक स्तोत्रांत किंवा केवळ काव्यक्षेत्रांत न शोभणारे असे थोडे फारसी, हिंदी, उर्दू व व्यावहारिक मराठी शब्द या वंदनांत आले आहेत. पण प्रस्तुत

